दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष २ रे || अंक २१४ || गुरूवार १८ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## २५व्या कारगिल विजय दिवसाच्या स्मरणार्थ मध्य रेल्वेचे गिर्यारोहक द्रास – कारगिल सेक्टरमधील माउंट टोलोलिंग आणि पॉइंट ५१४० मीटर शिखर सर करणार

मध्य रेल्वेचे, महाव्यवस्थापक यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि यश मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिले

श्री राम करन यादव, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी द्रास – कारगिल सेक्टरमधील माउंट टोलोलिंग आणि पॉइंट ५१४० मीटर शिखरांवर मोहिमेसाठी जाणाऱ्या गिर्यारोहकांच्या संघाचा सत्कार केला आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.ङ्गङ्गऑपरेशन विजयमध्ये सहभागी झालेल्या शूर सैनिकांना आदरांजली म्हणून संरक्षण मंत्रालयाने आयोजित केलेल्या मोहिमेचा हा संघ भाग आहे. कारगिल विजय दिवस, दरवर्षी दि. २६ जुलै रोजी साजरा केला जातो, तो दिवस जेव्हा भारतीय सैनिकांनी १९९९ मध्ये शत्रूने ताब्यात घेतलेल्या उंच पर्वताचा पुन्हा कब्जा केला. हा दिवस त्यांच्या धैर्याची आणि त्यांनी देशासाठी केलेल्या बलिदानाची आठवण करून देतो.ङ्गङ्गसेंट्रल रेल्वे ॲडव्हेंचर स्पोर्ट्स क्लब (सीआरएएससी) च्या नेतृत्वाखाली सेंट्रल रेल्वे स्पोर्ट्स असोसिएशन (सीआरएसए) च्या सहकार्याने मध्य रेल्वेच्या २२




रेल्वे कर्मचाऱ्यांचा संघ जो माउंट टोलोलिंग आणि पॉइंट ५१४० मीटर चढून हा आव्हानात्मक प्रवास करणार आहे. ङ्गङ्गसेंट्रल रेल्वे ॲडव्हेंचर स्पोर्ट्स क्लबच्या संघाचा राष्ट्रीय उद्दिष्टांसाठी मोहिमा हाती घेण्याचा समृद्ध इतिहास आहे. भूतकाळात, संघातील सदस्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २०२२ मध्ये श्री हेमंत आणि श्री संदीप यांनी ७१३५ मीटर उंच माउंट नुन शिखरावर यशस्वी चढाई केली होती तसेच २०२३ मध्ये, या जोडीने माउंट एव्हरेस्टवर ८००० मीटर उंची गाठली. अशी कामगिरी करणारे ते पहिले रेल्वे कर्मचारी ठरले. त्यांचे हे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

यावेळी बोलताना, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री राम करन यादव म्हणाले, ‘‘मध्य रेल्वे शूर सैनिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सलाम करते आणि मोहीम पथकाला शुभेच्छा देते. तसेच आम्हाला विश्वास आहे की, त्यांनी द्रासमधील माउंट टोलोलिंग व पॉइंट ५१४० मीटरचा प्रवास केला आहे त्यामुळे कारगिल सेक्टर यशस्वी होईल. अशा मोहिमा संघभावना, दृढनिश्चय, नेतृत्वगुण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या महान भारतीय राष्ट्राबद्दल आपुलकीची भावना निर्माण करतात.‘‘

श्री प्रभात रंजन, अपर महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे; श्री एम एस उप्पल, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी आणि अध्यक्ष सेंट्रल रेल्वे स्पोर्ट्स असोसिएशन; श्री रजनीश गोयल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मुंबई विभाग; मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, टीम सीआरएएससी आणि सीआरएसए चे सदस्य याप्रसंगी उपस्थित होते.

## नू.म.वि.शिशु शाळेत दिंडी सोहळा संपन्न

सोलापूर : ( सैफन शेख ) आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नू.म.वि.शिशु शाळेत टाळ मृदुंगाच्या गजरात व भगव्या




पताका हाती घेत विठू नामाचा गजर करीत दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या गटातील विद्यार्थी विठ्ठल रुक्मिणी संतांच्या भूमिके तर काही विद्यार्थी हे बाल वारकरी,पोलीस, डॉक्टर, फेरीवाले,दुकानदार या भूमिकेत छान तयार होऊन आपली भूमिका छान पार पाडत होते. तसे संत निवृत्तीनाथ संत ज्ञानेश्वर संत सोपान संत मुक्ताबाई संत तुकाराम यांच्याही पालख्या काढण्यात आल्या होत्या. जणू काही प्रति पंढरपूरच आहे असे वाटत होते सारा परिसर विठ्ठलमय झाला होता.ङ्गप्रमुख पाहुण्या पेठे उद्योग समूहाच्या सर्वेसर्वा सुवर्णा पेठे,चंदा पाटील व शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या हस्ते पालखी पूजन संतांचे पूजन करण्यात आले. सर्व बाल वारकरी प्रमुख पाहुणे यांच्यासोबत पालखीचे प्रस्थान झाले. बाल वारकऱ्यांचे शिक्षिका आणि शिक्षिकेत तर कर्मचारी यांचे रिंगण ही अतिशय सुंदर झाले पाहुण्यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची पूजा आरती करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनीङ्गमुलांचे व शाळेचे कौतुक केले या सोहळ्याचे सूत्रसंचालन सायली देशमुख यांनी केले.ङ्गया सोहळ्याचे नियोजन मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक प्रमुख अलका ओक व आरती मराठे यांनी केले.

## श्रीक्षेत्र भक्तीलिंग मल्लिनाथ महाराज देवस्थान येथे जय भारत माता सेवा समितीच्या वतीने गुरुपौर्णिमा यात्रा महोत्सव

महेश गायकवाड

अक्कलकोट सोलापूर पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील भिगवण आणि स्वामी चिंचोली सरहद्दीवर वसलेले श्रीक्षेत्र भक्तीलिंग मल्लिनाथ महाराज देवस्थान येथे जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदगुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात गुरुपौर्णिमा यात्रा महोत्सवनिमित्त देशभक्ती कार्यक्रमासह विविध धार्मिक कर्यक्रम आयोजित केले आहेत.




संसाराच्या व्यापातून थोडाकाळ विश्रांती मिळावा आणि भक्ताने आपले जिवन सार्थक करून शिव भक्तीतून देश भक्ती मार्गाकडे वळावे, या प्रमुख उद्देशाने सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजांनी आंध्रप्रदेश, तेलगण, कर्नाटका, महाराष्ट्रा, गुजरात, राज्यस्थान अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात सुमारे सहा हजारोहून अधिक शिवलिंग मंदिर आणि जय भारत माता सेवा समितीचे शाखा स्थापना केले आहेत. त्या पैकी भिगवण (स्वामी चिंचोली) येथील भक्तीलींग देवस्थान हे सर्वोच्च असून नवसाला पावणारा स्वयं जागृत सर्व धर्मीय श्रद्धास्थान देवस्थान आहे.

या गुरुपौर्णिमा यात्रेस प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही देश भरातील लाखो भाविक भक्त मोठ्या प्रमाणात येणार असल्याने यात्रा कमिटीचे वतीने यात्रेची जयत्त तयारी करण्यात येत आहे. शनिवार दि.२०जुलै रोजी रात्रौ देशभक्ती गीत, भजन, भारुड इत्यादी कार्यक्रम होणार असून रविवार दि.२१ रोजी पहाटे श्री चे महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार आहे. सकाळी आठ वाजता श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत काढण्यात येणार आहे. शनिवार आणि रविवार दिवसभर भक्ताचा राजा सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजाचा दर्शन सोहळा कार्यक्रम आहे.तरी भाविक भक्त आणि देश भक्तांनी उपस्थित राहून सदगुरूचा दर्शन, महाप्रसादाचा आणि देशसेवेचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटी वतीने करण्यात आला आहे

गुरू सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ आहे.सर्व भक्तांनी अंतकरणातून देश सेवा केला पाहिजे. इतर पूजा आणि सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ आहे. देश वाचला तरच आम्ही सर्व जण वाचणार आहोत. देशाचे एकता परंपरा अखंडपणे राखण्यासाठी सर्वांनी देशच माझे घर देशच माझे परिवार असे समजून एकजुटीने राहिले पाहिजे.

– सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज अध्यक्ष राष्ट्रीय संस्थापक जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली.

## छगन भुजबळांची हल्लीची भाषणं जोरदार शरद पवारांनी सांगितली भेटीतील चर्चा

पुणे मराठा ओबीसी आरक्षणाच्या वादात राज्य सरकारने सामंजस्याची भूमिका घ्यायला पाहिजे होती. त्यांनी तशी भूमिका घेतली नाही. त्यामुळे राज्यातील परिस्थिती बिघडली आहे. आज राज्यात शांततेची गरज आहे, यात माझ्या मनात शंका नाही. पण, राज्य सरकारची भूमिका समंजसपणाची, शहाणपणाची नव्हती, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी केली आहे. पुणे पत्रकार संघात शरद पवारांनी त्यांच्या पत्रकारितेतील उमेदवारीच्या काळातील आठवणींना उजाळा दिला. तसेच सध्याच्या राजकीय घडामोडींवरही भाष्य केले.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी नुकतीच शरद पवारांची भेट घेतली, त्यानंतर प्रथमच शरद पवारांनी मराठा ओबीसी आरक्षण प्रश्नावर जाहीर भाष्य केले. पवार म्हणाले की, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे आणि ओबीसी आरक्षण बचाव आंदोलकांसोबत मुख्यमंत्र्यांच्या लोकांनी, मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. त्यांच्यामध्ये काय संवाद झाला हे आम्हाला माहित नाही.

मुंबईत जरांगे आणि मुख्यमंत्री यांचा संयुक्त कार्यक्रम काही दिवसांपूर्वी पाहिला. त्यांच्यात काय डायलॉग होता, तो आम्हाला माहित नव्हता. आरक्षणासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार सरकारचा आहे. त्यामुळे त्या बैठकीला जाण्यात काही अर्थ नव्हता. त्यांनी (राज्य सरकारने) पन्नास लोकांच्या बैठकीत आम्ही यावे आणि आमचं मत मांडावं, असं सांगितलं हे काही आम्हाला बरोबर वाटलं नाही. राज्यकर्ते हे, निर्णय द्यायचा अधिकार यांचा,

सुसंवाद त्यांनी साधला आणि विरोधकांनी भूमिका स्पष्ट करावी आणि मग निर्णय घ्यावा, ही भूमिका समंजसपणाची, शहाणपणाची नव्हती, असा टोला शरद पवारांनी लगावला.

छगन भुजबळांनी सोमवारी शरद पवार यांची मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. त्याबद्दल शरद पवारांनी सुरुवातीला भुजबळांना त्यांच्या बारामतीतील भाषणावरुन चिमटा काढला. ते म्हणाले की, भुजबळांची हल्लीची भाषणं जोरदार झाली. एक बारामतीचं आणि दुसरं बीडचं. त्यांनी माझ्याबद्दल आस्था व्यक्त केली. मराठा आणि ओबीसी समाजात सध्या चांगली परिस्थिती नाही. आता शांतता प्रस्थापित करण्यासाठी आम्ही भूमिका घ्यावी यासाठी भुजबळांनी मला मार्गदर्शन केले, असा टोलाही त्यांनी लगावला.

## पुणेकरांसाठी खुश खबर! अनेक दिवसांपासून प्रलंबित चांदणी चौकातील पादचारी मार्गास हिरवा दिवा

पुणे– पुणेकरांसाठी एक महत्तवाची बातमी समोर आली असून वाहतुकी संदर्भात पुणेकरांना आता दिलासा मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या



चांदणी चौकातील पादचारी पुलाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या पादचारी मार्गाचे काम पूर्ण केले जाणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून चांदणी चौकातील एसटीचा नवीन बस स्टॉप ते इराणी कॅफे बावधन असा १०० मीटरचा लोखंडी फूट ओव्हर ब्रिज असणार आहे यामुळे पुणेकरांना मोठा दिलासा मिळेल.

चांदणी चौकातून दररोज हजारो प्रवाशांना जीव मुठीत धरून महामार्ग ओलांडावा लागतो. कारण महामार्गाच्या दुसऱ्या बाजूला जायचं असल्यास नागरिकांना तीन किलोमीटर पायी जावं लागतं आणि रिक्षाने जाण्यास साधारण शंभर रुपये द्यावे लागतात. त्यामुळे या मार्गावर पादचारी मार्ग असावा अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होती. आता हा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे असून हा पादचारी मार्ग झाल्यावर सुरक्षितरित्या पाच मिनिटात महामार्ग ओलांडता येणार आहे.प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र व्यवहार करून या समस्येची कल्पना देत तत्काळ पादचारी पूल उभारण्याची मागणी केली होती. मंत्री नितीन गडकरी यांनी देखील याबाबत सकारात्मकता दाखवली होती व त्यानुसार आता या पुलाचं काम मार्गी लागणार आहे.

चांदणी चौकातील पादचारी पुलाचा कामाला मंजुरी मिळाली असून हे काम कोल्हापूर येथील एमडी इन्फ्रा कंपनीला देण्यात आलं आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि एमडी यांच्यातील करार शेवटच्या टप्प्यात आहे. त्यानुसार महिनाभरात या पादचारी पुलाचे काम सुरू होईल अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयाकडून देण्यात आली आहे. या पादचारी पुलाचं काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या पुलावरून सुरक्षितरीत्या महामार्ग ओलांडता येईल तसंच वेळेची देखील बचत होणार आहे.

संपादकीय

## पळवाट

'आमचे येथे श्रीकृपेकरून अमुक अमुक यांचे सुपुत्र आणि अमुक अमुक यांची सुकन्या यांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तरी मांडवशोभेसाठी आपण अवश्य यावे' अशी कोणे एके काळची आपल्या वाडवडिलांच्या लग्नाची इतकी थेट पत्रिका धनाजीरावांच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. शरीरसंबंध मांडवशोभा छ्या हे म्हणजे फारच झाले. लग्न म्हणजे स्वर्गात बांधल्या जाणाऱ्या पवित्र गाठी, त्या पृथ्वीवर येऊन पक्क्या करायच्या असतात. त्याआधी दोन्ही घराणी किती तोलामोलाची आहेत, हे पाहायचे असते. लग्न म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, मेजवान्या, भेटवस्तू, नाचगाणी, भेटीगाठी हेच त्यांना माहीत होते. आपल्या आजोबा-पणजोबांच्या जीवनात जरा म्हणून मनोरंजन नव्हते, म्हणून त्यांनी अशा थेट आणि रूक्ष पत्रिका लिहून लग्ने उरकली. आपण आपल्या धाकट्याच्या बाबतीत मात्र तसे अजिबात करायचे नाही, असे धनाजीरावांनी ठरवून टाकले होते. त्याला कारणही तसेच होते. हे कारण काय आणि हे धनाजीराव कोण म्हणून विचारता? अहो तेच ते. कोणे एके काळच्या आटपाट नगरातले. नाही समजले? पहिल्यापासून नीटच सांगायला हवे आहे म्हणता? चला तर मग काय झाले की पूर्वीच्या कहाण्यामध्ये असते तसे एक आटपाट नगर होते. तिथे धनाजीराव आणि सुंदराबाई हे जोडपे राहत होते. आणि हो, या आटपाट नगरात धनाजीरावांच्या गावीही नसलेले एक नानाजीपंतही होते. पण आपणही त्यांची फार दखल घेण्याची गरज नाही. तर असो, गाठीला बक्कळ पैसा जोडलेल्या धनाजीरावांना गावात चांगलाच मान होता. त्यांचे कुटुंबही खाऊनपिऊन सुखी होते. धनाजीरावांच्या दोन गुणी मुलांचे विवाह झाले होते आणि त्यांच्या कुटुंबात एक सुशील सून आणि जावयाची भर पडली होती. आता त्यांच्या शेंडेफळाचे लग्न होऊ घातले होते. धनाजीरावांच्या घरातले हे शेवटचे कार्य. त्यामुळे सगळ्या पंचक्रोशीत त्याची चर्चा झाली पाहिजे, 'आजवर असा विवाह पाहिला नाही,' असे लोकांनी म्हटले पाहिजे असे धनाजीरावांना वाटत होते. शिवाय त्यांच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीच्या, त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत आटपाट नगरात महागाई अगदीच किरकोळ होती. त्यामुळे मग धनाजीराव आणि सुंदराबाई यांनी हा समारंभ झोकात, अगदी हात सैल सोडून करायचे ठरवले.

गावोगावी आमंत्रणे पाठवायची होती. धनाजीरावांचा मित्रपरिवार तसा मोठा आणि वेगवेगळ्या थरांमधला. कुणाला चढवायचे नाही आणि कुणाला उतरवायचे नाही म्हणून ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे पत्रिका छापायचे आणि पाठवायचे ठरले. आपल्या घरातून जाणारी लग्नपत्रिका पुढची पन्नास वर्षे लोकांनी जपून ठेवली पाहिजे, असे धनाजीराव आणि सुंदराबाई यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी पत्रिकाही अशा सोन्याचांदीचा वर्ख ल्यालेल्या छापल्या की त्या ज्यांना ज्यांना मिळाल्या त्या बघून सगळ्यांनी आ वासला. ज्यांना पत्रिका गेल्या नाहीत, त्यांना म्हणजे नानाजीपंतांना आपोआपच समजले की आपण किती मोठे व्हायला हवे, तर धनाजीरावांच्या घरून आमंत्रण यायला हवे एवढे. त्यामुळे ज्यांना धनाजीरावांकडून पत्रिका आली असे लोक आणि ज्यांना आली नाही असे लोक अशी आपोआपच जगाची विभागणी झाली. तर असो. लग्न समारंभ एकाच दिवशी झाला तर तो कशाला कुणाच्या लक्षात राहील, असे धनाजीरावांना वाटत होते. लग्न मुहूर्तावर लावायचे असल्यामुळे ते एकदाच लावावे लागते, पण साखरपुड्याचे तसे काही नसते अशी पळवाट गुरुजींनी काढून दिल्यावर सगळे कसे सोपे होऊन गेले. एकदा मुलाच्या घरी, एकदा मुलीच्या घरी, एकदा शेतातल्या बंगल्यावर असा तीन तीन वेळा साखरपुडा झाला. अशीच वेगवेगळ्या ठिकाणी तीन तीन वेळा व्याहीभोजने झाली. त्याशिवाय संगीत समारंभ, मेंदी समारंभ, सीमान्तपूजन आणि मुख्य लग्न समारंभ आणि त्यानंतरचा स्वागत समारंभ अबब या सगळया कार्यक्रमांमधल्या वधूवरांच्याच नाही, तर इतरांच्याही पोशाखांची, दागदागिन्यांची, जेवणावळींमधल्या पदार्थांची यादी ऐकूनच नानाजीपंतांची दमछाक होत होती. तीन साखरपुडे, तीन व्याहीभोजने आणि प्रत्यक्ष लग्न समारंभ यांत वेगवेगळे पेहराव करायचे, त्यावर वेगवेगळे दागिने घालायचे म्हणजे वऱ्हाडी मंडळींनीच धनाजीरावांच्या चिरंजीवांच्या विवाहासाठी किती बरे खर्च केला असेल, अशी चर्चा नानाजीपंतांच्या घरीदारी रंगू लागली.नानाजीपंतांना वाटू लागले, लग्न असावे तर असे नाही

# शेकाप इतिहास घडवेल : शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन : अलिबागमधील शेकाप भवनमध्ये साधला कार्यकर्त्यांशी संवाद

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे

शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता हा खंबीर आहे. पराभवाने खचणारा नाही. कष्टकरी, कामगारांसाठी लढणारा, कायम आपल्या तत्वांशी एकनिष्ठ असणाऱ्या शेकापची भुमिका आणि धोरणे वेगळी आहेत. त्यामुळे जिल्ह्यात, राज्यात शेतकरी कामगार पक्षाने स्वतःची एक ओळख निर्माण केली आहे. विद्यमान आमदार टक्केवारी घेऊन काम करतात. ही प्रकृती वाढल्यास तालुक्याचे नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याचे नुकसान होईल. शेकापने कायम संघर्षातून अस्तित्व निर्माण केले आहे. स्व. नाना पाटील, स्व. प्रभाकर पाटील,स्व. दत्ता पाटील या लढवय्या नेत्यांनी जिल्ह्यात वेगळे अस्तित्व निर्माण केले. विरोधी पक्षनेता म्हणून आजही शेकापला मान-सन्मान आहे. ही ओळख पुन्हा आपल्याला निर्माण करायची आहे. आगामी काळात खचून न जाता नव्या उमेदीने काम करु. निवडणूकीत विजय मिळवून एक वेगळा इतिहास निर्माण करायचा आहे. शेकाप पुन्हा इतिहास घडवेल, असे प्रतिपादन माजी आ. जयंत पाटील यांनी केले.

अलिबाग येथील शेतकरी भवनमधील सभागृहात मंगळवारी (दि.१६) कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी माजी आ. पंडित पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्या भावना पाटील,








शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेविका अश्विनी पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, माजी सदस्य संजय पाटील, साधना पाटील, तालुका शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

यापुढे मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, राजकारणात बदल होत आहे. मतांसाठी काळाबाजार केला जात आहे. आपण मतं मिळविण्यासाठी धनशक्तीचा वापर केला नाही. पैशाचा काळाबाजार करुन निवडून येणं हे आपल्या तत्वात बसत नाही, याचा अभिमान वाटतो. आगामी विधानसभा निवडणूकीत आपलाचा उमेदवार निवडून आला पाहिजे, या भूमिकेतून कार्यकर्त्यांनी मोठ्या जिद्दीने व मनात चिड ठेवून काम करायचे आहे, असे आवाहनही जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

### पंढरपूरला होणार अधिवेशन

पंढरपूर येथे शेतकरी कामगार पक्षाचे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. हे अधिवेशन दोन दिवसीय असून दि. २ ऑगस्ट रोजी दुपारी अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. या अधिवेशनात रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पाटील यांनी केले आहे.

पराभवाने अनेकांच्या डोळ्यात पाणी नुकतीच विधान परिषदेची निवडणूक झाली. या निवडणूकीत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्या आग्रहाखातर आघाडीमधून निवडणूक लढविली. मात्र ज्यांना आपण मदत केली, त्यांनीच आपली फसवणूक केली. आपल्या पराभवामुळे विधान परिषदेतील शिपायापासून ते सचिवापर्यंत अनेकांच्या डोळ्यातून पाणी आले. हाचा आपला सन्मान आहे. पण कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये. आपण वेगळ्या उमेदीने पुन्हा उभे राहू. ज्यांना आपण मोठे केले, त्यांनी फसविले आहे. त्यामुळे आगामी काळात पक्षाची वेगळी भुमिका असणार आहे. वेगळी ध्येय-धोरणे घेऊन काम करण्याची भूमिका घ्यावी लागेल. आपली बांधिलकी गोरगरीबांसोबत आहे. त्यांना केंद्रबिंदू मानून कार्यकर्त्यांनी काम करणे आवश्यक आहे. आगामी निवडणूकीत विजय मिळवून एक वेगळा इतिहास निर्माण करायचा आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागा, असे आवाहन करीत जयंत पाटील पुढे म्हणाले, जे फितूर होतात, त्यांना त्यांची जागा दाखविणे आवश्यक आहे. असा विजय मिळवा, की पुन्हा विरोधक उभा राहणार नाही.

येत्या दोन ऑगस्ट रोजी पंढरपूरच्या मंदिरात नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात करू या. त्यामुळे या अधिवेशनाला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा, असे आवाहन माजी आ. जयंत पाटील यांनी केले. गद्दारी, लाचारी आमच्या रक्तात नाही माजी आ. पंडित पाटील गरजले देशासह राज्यातील राजकारण बदलत आहे. धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी लढाई सुरू आहे. आपण ज्यांना मदत केली, त्यांनीच आपल्याशी गद्दारी केली आहे. त्याचा राग ठेवून कार्यकर्त्यांनी मतभेद विसरून कामाला लागा. गद्दारी, लाचारी हे आपल्या रक्तात नाही. गोरगरिबांचा, कष्टकऱ्यांचा आवाज आज सभागृहात कडाडणार नाही, हे संपूर्ण राज्याचं नुकसान आहे. आज शेकापच्या उमेदवाराचा पराभव करण्यासाठी संपूर्ण सरकारला ताकद लावावी लागते, हाच आपला विजय आहे. पराभवाने खचणारा आणि विजयाने उन्मत्त होणारा शेकापचे कार्यकर्ता नाही. आगामी निवडणूकीत आपला विजय झाला पाहिजे. या दृष्टीने प्रत्येकाने काम करा. शेकापचे नेते जयंत पाटील लवकरच विधान परिषदेचे आमदार होतील. ज्याप्रमाणे आज त्यांच्या स्वागतासाठी तयारी केली आहे, त्याप्रमाणे आमदार झाल्यावर त्यांच्या स्वागतासाठी सज्ज रहा. असे पंडित पाटील यांनी भावनिक आवाहन कार्यकर्त्यांना केले.

# राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अनिल कृष्णा राणे यांचा प्राथमिक शिक्षक संघ शाखा सुधागडच्या वतीने करण्यात आला सत्कार

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/ मंगेश यादव

सन २०२३/२४ साठीचा .... -. ., इंटिग्रेटेड सोशि यल वेलफेअर सोसायटी बेळगाव, नॅशनल रुरल डेवलपमेंट फाउंडेशन बेळगाव यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी श्री.अनिल कृष्णा राणे, मुख्याध्यापक शाळा नवघर यांची निवड झाली आहे. सदर पुरस्कारासाठी दिल्ली,महाराष्ट्र,गोवा,कर्नाटक,गुजरात या राज्यातून शिक्षकांची निवड करणेत आली आहे . सदर पुरस्कार वितरण सोहळा २६ मे २०२४ रोजी गोवा येथे शानदार कार्यक्रमात संपन्न झाला . अनिल राणे ३४ वर्षे शिक्षण क्षेत्रात भरीव व मोलाचे योगदान देत आहे. मागील काही वर्षात पाच्छापूर शाळेत कार्यरत असताना लोकसहभागातून व स्वतः पदरमोड करून त्यांनी पाच्छापूर शाळेचा कायापालट करण्यात मोलाची कामगिरी केली आहे. चे जिल्हा समन्वयक श्री रत्नशेखर गजभिये यांच्या सहकार्याने आदर्श शाळा विकास कार्यक्रमात सहभाग घेऊन त्यांनी शाळेत सर्व भौतिक सुविधा उपलब्ध केल्या आहेत. सन २०१७ ते सन २०२० या कालावधीत पाच्छापूर शाळेतील एकूण ११ विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती




परीक्षेत श्री अनिल राणे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम कामगिरी करत शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.सन २०२२/ २३ या शैक्षणिक वर्षात पी एम श्री योजनेत पाच्छापूर शाळेची निवड होण्यादाठी त्यांनी मुख्याध्यापक म्हणून विशेष प्रयत्न केलेत.ङ्गमागील शैक्षणिक वर्ष सन २०२३/ २४ मध्ये नवघर शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्य करताना रायगड जिल्हा परिषद शाळा नवघरने २०२३ /२४ मध्ये ''मुखमंत्री माझी सुंदर शाळा '' या उपक्रमात जिल्हा स्तरावर तृतीय,तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच सन २०२३/ २४ मध्ये नवघर शाळेतील इयत्ता ८वीच्या एकूण ७ विद्यार्थ्यांनी परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.

तसेच सन २०२३/ २४ मध्ये नवघर शाळेतील एका विद्यार्थ्याची जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे निवड झाली आहे. यामध्ये मुख्याध्यापक अनिल राणे सर व शिक्षकवृंद यांचे मोलाचे योगदान आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.या पूर्वी त्यांना सन २०१९ मध्ये रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. अभ्यासू, प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ, सामाजिक, शैक्षणिक कार्याची आवड, सहकार्य, संघटन कौशल्य,विद्यार्थीप्रिय शिक्षक इत्यादी गुणांमुळे रायगड जिल्ह्यामध्ये त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आज मंगळवार दिनांक १६/७/२०२४रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा सुधागड, प्रेरणा स्वयंसेवी संस्था व स्वप्नपूर्ती गृहनिर्माण सोसायटी पाली यांच्या वतीने श्रीफळ, पुष्पगुच्छ व शाल देऊन श्री अनिल कृष्णा राणे यांचा सत्कार करण्यात आला आणि भविष्यातील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, जिल्हा समन्वयक रत्नशेखर गजभिये,शाळा व्यवस्थापन समिती नवघर अध्यक्ष व सर्व सदस्य,शिक्षक नेते ग. रा.म्हात्रे, क. रा.शिंदे,सुधागड तालुका समन्वय समिती अध्यक्ष मोरेश्वर कांबळे यांनी राणे सर यांचे अभिनंदन केले आहे.ङ्ग सदर कार्यक्रमासाठी गट शिक्षणाधिकारी साधुराम बांगारे , प्रेरणा स्वयंसेवी संस्थेचे उपाध्यक्ष क रा शिंदे, सचिव कैलास म्हात्रे, शिक्षक संघांचे उपाध्यक्ष सुनिल भिलारे, राजू बांगारे,खजिनदार जनार्दन भिलारे, शिक्षक संघांचे, प्रेरणा स्वयंसेवी संस्थेचे व स्वप्नपूर्ती गृहनिर्माण संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

# वर्षावास धम्म प्रवचन मालिकेत सर्वांनी सामिल व्हा चंद्रकांत सोनावणे

नागोठणे -:नारायण म्हात्रे

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा रायगड उत्तर अंतर्गत शाखा तालुका पेण यांच्या वतीने गेले अनेक वर्ष ही वर्षावास प्रवचन मालिका पेण तालुक्यात सातत्याने राबविली जाते. अडीच हजार वर्षापूर्वी तथागत गौतम बुध्दांना ज्ञान प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध झाले त्यावेळी सर्व प्रथम बुद्धानी त्यांच्या सोबत असलेल्या पाच भिकुना आपल्या पहिल्या प्रवचनाच्या माध्यमातून आपल्याला झालेल्या ज्ञान प्राप्तीचे विचार, बौद्ध धम्माचे महत्व समजावून सांगितले व येणाऱ्या काळात त्यांनी आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा या काळात गावो गावी फिरून लोकांना बौद्ध धम्माची शिकवण अर्थात बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचे आदेश दिले तो दिवस होता आषाढ पौर्णिमा अर्थात गुरु पौर्णिमा तेव्हा पासुन ही वर्षावास धम्म प्रवचन मालिका अनेक देशांत सुरू आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर



यांनी १९५६ साली महाराष्ट्रात नागपूर येथे बौद्ध धम्माची दिक्षा दिली तेव्हा पासून या देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने वर्षावास धम्म प्रवचन मालिका राबविण्यात येते. भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय संरक्षिका महाउपासिका मिरा आंबेडकर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही वर्षावास धम्म प्रवचन मालिका संपूर्ण देशात विविध भाषेत राबविण्यात येते त्याच अनुषंगाने भारतीय बौद्ध महासभा जिल्हा रायगड उत्तर अंतर्गत तालुका शाखा पेण यांचे माध्यमातून ही वर्षावास धम्म प्रवचन मालिका पेण तालुक्यात प्रति वर्षी सातत्याने राबविली जाते. दि.२१ जुन २०२४ आषाढ पौर्णिमा ते १७ ऑक्टोबर २०२४ आश्विन पौर्णिमा असे तीन महिने चालाणाऱ्या या वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे उदघाटन रविवार दि. २१ जुन २०२४ रोजी रायगड जिल्ह्याचे वतीने पनवेल तालुक्यात होत असुन पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यात रविवार दि.२८ जुन २०२४ पासून मालिकेला सुरवात होत आहे. पेण तालुक्यातील पहिले पुष्प संस्थेचे कार्यालयीन सचिव आयु. मंगेश रमेश कांबळे यांच्या दुश्मी येथील निवासस्थानी संपन्न होत असुन या पुढील वर्षावासाचे सर्व पुष्प पेण तालुक्यात पेण शहरासह ग्रामिण भागात खेडोपाड्यात लोकांच्या मागणी नुसार राबविण्यात येणार आहेत. या वर्षावासाच्या धार्मिक कामात सर्वांनी सहभागी होऊन हा तथागतांचा धम्म कार्य आपल्या सहभागाने खेडोपाड्यात पोहचवा असे आवाहन पेण तालुक्याचे अध्यक्ष चंद्रकांत दादा सोनावणे यांच्या वतीने करण्यात येत आहे. हि वर्षावास धम्म प्रवचन मालिका यशस्वी होण्यासाठी रायगड जिल्हा अध्यक्ष विजय गायकवाड यांनी पेण तालुक्यासाठी नामवंत अशा १९ केंद्रीय शिक्षकांची (प्रवचनकारांची) नियुक्ती केली आहे. अशी माहिती पेण तालुका भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष आयु.चंद्रकांत सोनावणे यांनी दै. सूर्योदयशी बोलताना जाहिर केले आहे.

# आषाढी एकादशी निमिताने अंगणवाडी चिराठी येथे दिंडीचे आयोजन लहान चिमुकले बनली वारकरी विठु नामाचा गजर करी

द. रा. जि. प्रतिनिधी:
संतोष उद्धरकर.

म्हसळा: म्हसळा शहरातील अंगणवाडी चिराठी व रा. जि.प. शाळा चिराठी यांच्या संयुक्त पणे आषाढी एकादशी साजरी करण्यात आली, चिमुकल्यांना पारंपारीक वेषभुषेत वारकरी बनवुन गावातुन विठु नामाचा गजर करीत दिंडी काढण्यात आली, यावेळी अंगणवाडी



सेविका सानिका उध्दरकर, मदतनिस प्रमिला चव्हाण, गुरुजी महादेव निगुडकर यांनी देखील विद्यार्थी यांच्या सोबत जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल गजर करीत विठुमाऊलीच्या भक्ती मध्ये तल्लीन होताना दिसत होते, चिराठी अंगणवाडीमध्ये दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यामागील एकच उद्दीष्ट आहे कि आपल्या लहान मुलांना आत्तापासुनच आपले सण, उत्सव कशा प्रकारे साजरे करायला पाहीजेत याचे महत्व पटवुन देऊन इंटरनेटच्या युगात आपले सण, उत्सव यांच्या कडे दुर्लक्ष होता कामा नये तेच आम्ही जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो असे अंगणवाडी सेविका सानिका उध्दरकर यांनी सांगितले. तसेच सानिका यांच्या कडुन सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप देखील करण्यात आले.यावेळी ग्रामस्थ यांनी देखील सहभाग घेऊन या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

# बेबंदशाहीचे 'पूजा'पाठ!

शैक्षणिक व्यवस्थेचे मातेरे करून, अभियांत्रिकी, वैद्याकीय शाखांचा खेळखंडोबा करून आता आपण केंद्रीय लोकसेवा परीक्षांमध्ये दिवे लावायला सुरुवात केली आहे.

स्पर्धा परीक्षांवर सर्व लक्ष केंद्रित करणारे या देशातील बुद्धिमान, कष्टकरी इत्यादी इत्यादी विद्यार्थी आणि त्यांच्या यशाच्या स्वप्नरंजनात मशगूल पालक या उभयतांनी पूजा खेडकर यांचे शतश: आभार मानायला हवेत. यश मिळविण्यासाठी अभेद्या, दुष्प्राप्य वगैरे समजल्या जाणाऱ्या या परीक्षांच्या आणि नंतरच्या अधिकारी निवड प्रक्रियेचा बुरखा या पूजाबाईनी टराटरा फाडला असून त्यांच्या या एकहाती कर्तबगारीची नोंद देशाच्या प्रशासकीय इतिहासात सुवर्णाक्षरांत केली जाईल, यात तिळमात्रही शंका नाही. एखादी व्यक्ती व्यवस्था, नीती-नियम आदींस खुंटीवर टांगून पोलादी परीक्षा यंत्रणेचा लौकिक कसा मातीमोल करू शकते आणि असे करून मजबूत मानली जाणारी यंत्रणा किती कचकड्याची आहे हे दाखवून देऊ शकते याचे या पूजाबाईइतके उत्तम उदाहरण शोधूनही सापडणार नाही. अर्थात त्यांच्या या अभूतपूर्व यशामागे बुद्धिमान, प्रामाणिक कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही अशी वदंता असणाऱ्या परीक्षांचे पार मातेरे करण्यात समाज म्हणून आपल्या निष्क्रिय सहभागाचा वाटा आहे हे नाकारता येणार नाही, हे खरे. अलीकडेच आपण वैद्याकीय अभ्यासक्रमासाठी अत्यंत चुरशीच्या मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षांचे उत्तम वाटोळे केले. ते पूर्ण व्हायच्या आत या पूजाबाईच्या सौजन्यामुळे स्पर्धा परीक्षांचा क्रम लागला. आयएएस, आयपीएस, आयएफएस इत्यादी परीक्षांत यशस्वी होणे या देशातल्या प्रत्येक तरुण-तरुणीचे स्वप्न असते आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी शिक्षणाच्या बाजारपेठा दुथडी भरून वाहत असतात. या परीक्षांत यशस्वी होण्यासाठी किती कष्ट करावे लागतात, दिवसाचे २०-२० तास अभ्यास करावा लागतो, मुलाखतीचे तंत्र आत्मसात करावे लागते, सामान्यज्ञान उत्तम असावे लागते, चतुरस्रा व्यक्तिमत्त्व विकासाचा ध्यास असावा लागतो इत्यादी इत्यादी कथाकहाण्यांनी घरोघरीचे शैक्षणिक वातावरण भारलेले असते. तथापि या परीक्षा, त्यांची निवड पद्धती प्रत्यक्षात कोणत्याही ग्रामसिंह शिक्षणसम्राटाच्या संस्थेतील प्रवेश प्रक्रियेप्रमाणे 'मॅनेज' करता येऊ शकते किंवा काय असा प्रश्न या पूजनीय पूजाबाईची कृती दर्शवते. त्यांच्या या कर्तृत्वासाठी स्पर्धा परीक्षांसाठी रक्त आटवणाऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या त्यांच्या ऋणात राहतील.याचे कारण इतके दिवस प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रशिक्षण अकादमी ही फक्त उच्च दर्जाची वधू-वर संस्था आहे असे मानले जात होते. देशातील अनेक पॉवरफुल अधिकाऱ्यांच्या पॉवरफुल जोड्यांच्या गाठी स्वर्गात नव्हे तर मसुरीच्या या प्रशिक्षण अकादमीत बांधल्या जातात, हे अनेक जण जाणून होते. त्यामुळे पती कलेक्टर तर पत्नी सीईओ, हा गृहसचिव तर ती महसूल खात्यात, ती आयकर खात्यात तर तो अबकारीत इत्यादी अनेक सरकारी मेहुण हा देश पाहात आलेला आहे. आपल्या सुविद्या श्वानाच्या फेरफटक्यात व्यत्यय नको म्हणून आयएएस अधिकारी जोडपे स्टेडियमवर खेळाडूंनाच प्रवेशबंदी कशी करू शकते हे आपण पाहिलेले आहे. आपल्या (अर्थातच प्रिय) पत्नीच्या प्रभात आणि सायंकालीन फेरफटक्यात अन्य कोणाची बाधा नको म्हणून पटांगणावर सामान्यांसाठी निर्बंध आणणारा कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी महाराष्ट्रानेही याचि देही बघितलेला आहे. सेवाकाळात संधान बांधून निवृत्त झाल्या झाल्या उद्योग समूहास 'दुनिया मुठ्ठी मे' घेण्यात कायावाचामनोभावे साथ देणारे आयएएस अधिकारी तर डझनांनी सापडतील. निवृत्त झाल्या झाल्या राजकीय पक्षांत सहभागी होऊन थेट निवडणुकांच्या राजकारणात उतरणारे, निवृत्योत्तर पदांची बेगमी सेवाकाळात करणारे वगैरे तर किती दाखवावेत!

सत्ताधाऱ्यांच्या वळचणीस राहून त्यांच्यावर होणाऱ्या सत्तासंपत्ती वर्षावाचे चार तुषार आपल्याही अंगावर कसे उडतील याची खबरदारी घेणारे इत्यादींची तर गणतीच नाही. पण एक प्रशिक्षणार्थी पूजा निपजते आणि या सर्वांपेक्षा आपण किती सरस हे दाखवून देते ही बाब कौतुकास्पदच! आधीच्या पिढीचे कर्तृत्व पुढची पिढी आणखी पुढे नेते ते असे. यावरून काही मुद्दे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होतात.

जसे की आपल्या शैक्षणिक व्यवस्थेचे झाले आहे तितक्या मातेऱ्यावर आपण समाधानी नाही. पहिली ते दहावी, बीए, बीएस्सी, बीकॉम वगैरे पदवीधारी पण प्रत्यक्षात अक्षरओळखी बुद्धिमत्तेच्या पिढ्यानपिढ्या प्रसवल्यानंतर आपण आपल्या अभियांत्रिकीचा खेळखंडोबा केला. टुकार दर्जाचे इतके अभियंते आपण निर्माण केले की त्यांच्या कौशल्यापेक्षा 'आयटीआय' प्रमाणपत्रधारी अधिक उपयुक्त आणि गुणवंत ठरू लागले. अशा तऱ्हेने अभियांत्रिकीचे दिवाळे निघाल्याची खात्री झाल्यावर आता क्रम वैद्याकीय शाखेसाठी आवश्यक 'नीट' परीक्षांचा. याबाबतही तसा महाराष्ट्र आघाडीवर. ऐन निवडणुकांच्या तोंडावर राजकीय सोयीसाठी नवे आरक्षण धोरण आणून काही वैद्याकीय शाखांत खुल्या प्रवर्गात एकही प्रवेश मिळू न देण्याची व्यवस्था महाराष्ट्राने २०१९ सालीच करून दाखवली. त्यानंतर पावित्र्य राखून होत्या दोनच विद्याशाखा. 'आयआयटी'चे अभ्यासक्रम आणि केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या आयएएस वगैरेसाठींच्या परीक्षा. त्याच्याआधीच्या राज्य लोकसेवा आयोग परीक्षांची माती आपण यशस्वीपणे केलेली आहेच. यातही महाराष्ट्राचा दबदबा मोठा. परीक्षांपाठोपाठ परीक्षांचे पेपर कसे फोडता येतात, हे या राज्याने दाखवून दिले. असे होत असताना केंद्रीय लोकसेवा परीक्षांचा लौकिक तसा टिकून होता. या परीक्षांतील यशस्वी सेवेत आले की उत्तरायुष्यात किती तेजस्वी दिवे लावतात हे सर्वांस ठाऊक होतेच. पण ही 'दिवेलागण' परीक्षांपासूनच सुरू करता येऊ शकते हे दाखवून देण्याचे श्रेय मात्र या पूजाबाईचे. कोट्यधीश पालक असतानाही त्यांचे उत्पन्न त्यांच्या या 'सुकन्ये'च्या निवडीच्या आड येऊ शकत नाही, बहुविकलांगत्वाचा दावा केलेल्या व्यक्तीचे वैद्याकीय प्रमाणपत्र तपासायला हवे असे निवडणाऱ्यांस वाटत नाही

# अदानी फाऊनडे शन दिघी पोर्ट लिमिटेड आणि हेल्पेज इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य सेवा आपल्या दारीं

रायगड जिल्यातील दिघी वेळास येथे मोफत आरोग्य शिबीर आयोजित केले होते या वेळी आशा सेविका बचत गट



तसेच आंगण वाडी महिला नाच्या उपस्थितीत वृद्ध महिला तसेच इतर वयोगटा तील नागरिकांनी मोफत तपासणीचा लाभ घेतला गोल्ल्या औषध्ये मोफत दिली जात होती खुप मोठ्या प्रमाणात नागरिकांनी उपस्तिती दाखविली हेल्पेज इंडिया चे डॉक्टर उपस्तितीत राहून रुग्णांना चांगल्ल्या प्रकारे तपासणी करत असताना चित्र दिसत होते या वेली रुग्णवहीका चे उदघाटन वयोरुद्ध नागरिकांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जयश्री काळे मॅडम वेळास ग्रामपंचायत चे ग्रामसेवक तसेच समाजसेवक धवल तवसाळकर आशा सेविका स्नेहा मुरकर अंगणवाडी नीलम पाटील बचत गट मधील शरयु तोंडळेकर तसेच सेजल पेडणेकर दिपक वाझे सुदर्शन शिलकर बाळू पवार असे अनेक समाज कार्यकर्ते वेळासातील उपस्तितीत होते

# केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ फक्त एक आठवडा बाकी

केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ फक्त एक आठवडा बाकी असताना, अनुकूल व्यवसाय वातावरणासाठी अधिक अर्थसंकल्पीय वाटपासाठी सरकारकडून इंडिया इंकला सवलतीच्या अपेक्षा नेहमीच उच्च आहेत. या संदर्भात सुप्रिया लाइफसायन्स लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सतीश वाघ यांनी फार्मास्युटिकल आणि हेल्थकेअर उद्योगासमोरील आव्हाने आणि संधी बाबत



मार्गदर्शन करताना केल्या. एक्स्प्रेस फार्माशी बोलताना डॉ. वाघ म्हणाले, ''भारतीय औषध उद्योग, ज्याचे मूल्य ५० अब्ज आहे आणि राष्ट्रीय जीडीपीमध्ये सुमारे १.७२ टक्के योगदान आहे, देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आमच्या उद्योगाची प्रभावी वाढ असूनही, अनेक महत्त्वाच्या बाबतीत टिकवून ठेवण्यासाठी आणि गती देण्यासाठी क्षेत्रांना आणखी लक्ष देण्याची गरज आहे.'' उद्योगासमोरील लॉजिस्टिक आव्हानांवर प्रकाश टाकताना ते म्हणाले, ''आम्ही सीमाशुल्कांकडून लॉजिस्टिक मंजुरींना सुनिश्चित करणाऱ्या उपायांची अपेक्षा करतो, कारण ही एक महत्त्वाची अडचण आहे. कार्यक्षम आणि जलद मंजुरीमुळे आमची पुरवठा साखळी वाढू शकते, त्यामुळे महत्वाच्या औषधांचा वेळेवर वितरण सुनिश्चित करणे सोपे होईल.'' ङ्क आघाडीवर ते म्हणाले, ''भारतातील फार्मास्युटिकल गुंतवणूक आता ८-१०% महसुलावर आहे, जी जागतिक सरासरी १५-२०% पेक्षा कमी आहे. वर्धित कर सवलत आणि फंडिंगमुळे औद्योगिक नवनिर्मिती होऊ शकते, ज्यामुळे आम्हाला जगभरात स्पर्धा करण्यासाठी आणि मेक इन इंडियाच्या उद्दिष्टांमध्ये योगदान देण्यासाठी २०३० पर्यंत भारतीय फार्मास्युटिकल मार्केट १३० बिलियनपर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे, परंतु त्यासाठी हे आवश्यक आहे की अर्थसंकल्पाने फार्मास्युटिकल्समधील अत्याधुनिक संशोधनासाठी अनुकूल परिसंस्थेच्या निर्मितीला समर्थन दिले पाहिजे.''ङ्कङ्क डॉ सतीश वामन वाघ ङ्कअध्यक्ष तसेच व्यवस्थापकीय संचालक सुप्रिया लाइफसायन्स लिमिटेड

# कर्जत शिशु मंदिर शाळेच्या वतीने आषाढी एकादशी वारी दिंडी संपन्न...

कर्जत (-जयेश जाधव)

कर्जत शिशु मंदिर शाळेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्ताने चिमुकल्याच्या वारीने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.आज आषाढी एकादशीच्या निमित्ताने दरवर्षीची परंपरा कायम ठेवत भक्तीमय वातावरणात पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले . ङ्क शहरातील अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या वतीने शिशु मंदिर, शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थांनी संपुर्ण शहरातून दिंडी काढण्यात आली यावेळी विठ्ठल रखुमाई, थोर संतांची रूपे बालकांनी विविध वेशभूषा धारण केली होती, तसेच पालखी घेऊन विठुनामाचा गजर करीत विठ्ठलाचे नामस्मरण करीत विद्यार्थी तल्लीन होऊन दिंडीमध्ये रममाण झाले होते.विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या संस्कृतीची माहिती व अनुभव मिळण्यासाठी या दिंडीचे आयोजन करण्यात येते. ङ्क शहरातील श्रीराम पुलाजवळ उभारण्यात आलेल्या प्रति पंढरपूर आळंदी येथे विद्यार्थ्यांनी पायी दिंडी काढून विठुरायाचे



दर्शन घेऊन विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.आमदार महेंद्र थोरवे यांच्या कल्पनेतून साकारलेल्या श्रीराम पुलाजवळ प्रति पंढरपूर आळंदी येथे उभारलेल्या विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची एकच रांग लागलेली होती आषाढी एकादशी निमित्त येथे भक्तिमय भावगीत व भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.ङ्कयाप्रसंगी नगरसेवक संकेत भासे, दिनेश कडू, आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन यांच्याकडून विद्यार्थ्यांना व भक्तांना प्रसाद व पाण्याची सोय करण्यात आली.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा गुरुवारी एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

रत्नागिरी, (जिमाका):- येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कॅम्पस इंटरव्ह्यूवप्रमाणे उद्या गुरुवार १८ जुलै रोजी रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यामध्ये सहभागी होर्णाया रोजगार इच्छुक युवक युवतींसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकतामार्फत आज एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी फिनोलेक्स



अकॅडमी अँन्ड मॅनेजमेंट टेक्नॉलॉजीजचे प्राध्यापक प्रतीक कांबळे व प्रभारी कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार, सुधीर कांबळे यांनी उमेदवारांना मार्गदर्शन केले. ङ्गप्राध्यापक प्रतीक कांबळे यांनी उमेदवारांना प्रात्यक्षिकाद्वारे मुलाखतीस कसे सामोरे जावे, मुलाखतीसाठी रिझ्युम कसा तयार करावा याबाबतची माहिती दिली. तर सुधीर कांबळे यांनी शिकाऊ उमेदवारी कायदा याबाबत मार्गदर्शन केले.

सहायक आयुक्त इनुजा शेख यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची माहिती दिली. रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या खासगी आस्थापना व त्यांच्याकडे असणाऱ्या रिक्त पदांची माहिती दिली व रोजगार मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती शेख यांनी केले. या कार्यशाळेस १०८ उमेदवार उपस्थित होते.

## कर्जत शारदा मंदिर शाळेत आषाढी एकादशी निमित्त पायी दिंडीचे आयोजन

कर्जत;-(जयेश जाधव) अभिनव ज्ञान प्रबोधिनी एज्युकेशनल ट्रस्टचे शारदा मंदिर मराठी माध्यमाच्या वतीने दरवर्षी पायी दिंडीचे आयोजन केले जाते. या वर्षी सुद्धा दहिवली येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात एकादशीच्या दिवशी शाळेतील विद्यार्थी भजन, टाळ,




मृदुंगाच्या गजरात विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन झाले. या वेळी परिसरातील भाविक सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल देशमुख सर, संगीत दिविजा पुरोहित मॅडम, तबल्यावर माजी विद्यार्थी कु. यश हजारे यांनी साथ दिली. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील शिक्षक श्रध्दा जामघरे, रूपाली देशमुख, चेतना महांगडे, . शैला येंदे, . सौरभ गुरव व विजय सावंत सर यांनी केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शाळेच्या मुख्यध्यापिका अंजली किसवे मॅडम व संस्थेचे अध्यक्ष पुराणिक सर तसेच सर्व पदाधिकारी यांनी केले. तसेच शाळेतील शिपाई शरद उतेकर, निशा गाढे यांनी संपूर्ण कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

## कोकण धनगर समाजाचा रत्नागिरी येथे शिवसेना मेळावा

मंडणगड प्रतिनिधी

कोकण विभागातील बहुसंख्य धनगर समाज नोकरी/व्यवसाय निमित्त मुंबई शहरात असुन समाजाची निष्ठा कायम शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षा बरोबर आहे.सह्याद्री पर्वताच्या द-याखो-यांत राहाणा-या धनगर समाजापर्यंत विकास पोहचविण्याचे काम शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माध्यमातून झालेले आहे याची जाणीव धनगर समाजाला आहे.कोकणातील काही नेत्यांनी आपल्या सोयीसाठी पक्षांतर केले आहे.परंतू अशा स्वार्थासाठी दलबदलू नेत्यांच्या पाठीशी धनगर समाज कदापि राहाणे शक्य नाही.धनगर समाज प्रामाणिक व स्वाभिमानी आहे.

कोकणातील धनगर समाजाचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकांत कोकण विभागातील उमेदवारांना जाहीर पाठिंबा देणे.व धनगर समाजाच्या



अडीअडचणी सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे या उद्देशाने कोकण विभागातील मुंबईतील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष समर्थक शिवसैनीक बांधवांचा मेळावा मुंबई, घाटकोपर येथे दिनांक २८/७/२०२४ रोजी सायंकाळी ठिक ६ वाजता,''पाटीदार समाज हॉल'' एल बी एस मार्ग, सर्वोदय हॉस्पिटल जवळ, घाटकोपर (पश्चिम), मुंबई ४०००७७ या ठिकाणी संपन्न होणार आहे

सदर मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक शिवसेना नेते व गुहागर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा.भास्करशेठजी जाधव, रत्नागिरी जिल्हा प्रमुख व दापोली विधानसभा मतदारसंघाचे भावी आमदार मा.संजयरावजी कदम व ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार संजयजी दिना पाटील यांना निमंत्रित करण्यात आले आहे.ङ्ग कोकण विभागात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी शिवसैनिकांना बळ व प्रेरणा देण्याच्या दृष्टीने या मेळाव्याकडे पाहीले जात आहे.कोकणातील शिवसेनेचे ढाण्या वाघ समजले जाणारे मा भास्करशेठजी जाधव व संजयरावजी कदम यांच्या शाब्दिक तोफा मुंबईत धडाडणार असल्याने कोकण विभागातील मुंबईतील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

रामचंद्र बाबू आखाडे
संपर्क नं - ९२२२८०७९४२

## ग्रुप ग्रामपंचायत शिरगाव येथे मा.तहसीलदार साहेब व गटविकास अधिकारी यांचे विविध शासकीय योजना बाबत मार्गदर्शन

शेनाळे प्रतिनिधी :

ग्रुप ग्रामपंचायत शिरगाव चे ग्रामविकास अधिकारी श्री.संतोष हुमणे यांनी शिरगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अंगणवाडी सेविका व आशा सेविका यांचे मार्गदर्शनपर शिबिर दि.१६/०७/२०२४ ग्रुप ग्रामपंचायत शिरगाव येथे भरवले होते.या मार्गदर्शनपर शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.श्री.श्रीधर गालीपेल्ली (तहसीलदार साहेब मंडणगड),मा.श्री.विशाल जाधव



(गटविकास अधिकारी पंचायत समिती मंडणगड) यांना आमंत्रित करण्यात आले होते. मा.श्री.श्रीधर गालीपेल्ली साहेब यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना,वयोश्री योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनांचे सविस्तर मार्गदर्शन केले.या योजनांच्या बाबत येणाऱ्या अडचणी अंगणवाडी सेविका व आशा सेविका यांच्याकडून जाणून घेऊन त्याचे निरसन केले व या योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.मा.श्री.विशाल जाधव साहेब यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ जनजागृती करून लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.

या मार्गदर्शनपर शिबिरासाठी श्री.निलेश गोडगासे(मंडळ अधिकारी म्हाप्रळ),श्री.गणेश पेंढारे(सरपंच),श्री.अमित बैकर(पोलीस पाटील शेनाळे),श्री.विधान पवार,श्री.उदय गोसावी,श्री.दीपक पांढरे,श्री.ज्ञानदेव पाटील व पंचक्रोशीतील सर्व आशा सेविका,अंगणवाडी सेविका, मदतनीस, उपस्थित होत्या.ग्राम विकास अधिकारी श्री.संतोष हुमणे यांनी निमंत्रितांचे आभार मानून मार्गदर्शनपर शिबिराचा समारोप केला.

## मंडणगड ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कुल च्या वतीने आषाढी एकादशी वारी

मंडणगड प्रतिनिधी

मंडणगड ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कुल च्या वतीने आषाढी एकादशी वारी च्या



निमित्ताने चिमुकल्याच्या वारीने शहरातील वातावरण भक्तिमयङ्गआज आषाढी एकादशी च्या निमित्ताने दरवर्षीची परंपरा कायम ठेवत भक्तीमय वातावरणात दिंडी चे आयोजन करण्यात आले . प्रशालेच्या वतीने संपुर्ण शहरातून दिंडी काढण्यात आली यावेळी विठ्ठल रखुमाई, थोर संतांची रूपे बालकांनी धारण केली होती, तसेच पालखी घेऊन विठुनामाचा गजर करीत विठ्ठलाचे नामस्मरण करीत विद्यार्थी तल्लीन होऊन दिंडीमध्ये रममाण झाले होते.

विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या संस्कृतीची माहिती व अनुभव मिळण्यासाठी या दिंडीचे आयोजन करण्यात येते यामध्ये सर्व जाती धर्माचे आजी माजी विद्यार्थी उत्साहाने सहभागी होतात प्रशाळेच्या मुख्याध्यापिका सौ वैदेही जाधव यांच्या नेतृत्वाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख त्रिवेणी मर्चंडे यांनी त्यांच्या सहकारी ङ्गपूनम स्वामी, सोनाली मर्चंडे, समृद्धी पंदिरकर,प्राजक्ता पारेख, सिद्धी गावडे, विशाल महाडिक यांच्यासह नेटके नियोजन केले होते, यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ चारुलता पारेख, कार्यालय कर्मचारी नितीन दिवेकर यांच्यासह पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

## आम आदमी पार्टी तर्फे मोहरम आणि आषाढी एकादशी निमित्त सरबत वाटप

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:

खोपोली येथील आम आदमी पार्टी कार्यालयाच्या समोर पक्षाच्या सदस्यां तर्फे मोहरम आणि आषाढी एकादशीचे औचित्य साधून सरबत वाटप करण्यात आले. ङ्गसदर कार्यक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद घेऊन आम आदमी पार्टी शहरात उत्कृष्ठ असे उपक्रम करीत आहे असे प्रतिपादन केले. पक्ष नेहमीच अग्रणी भूमिका घेऊन सणांमध्ये अशाप्रकारे उपक्रम राबवीत असतो. यापूर्वी सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आम्ही पाणी सेवा कार्यक्रम ठेवला होते तसेच होळी निमित्त खिचडी वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. आम आदमी पार्टी प्रत्येक सणांमध्ये अशाच प्रकारे सेवा




देत राहणार आहे असे आम आदमी पार्टी शहर नेते ग्यासुद्दीन खान यांनी सांगितले.ङ्गपक्ष महाराष्ट्रामध्ये जोमाने वाढत आहे आणि येणाऱ्या काळामध्य विधानसभेच्या आणि नगरपरिषद, महानगर पालिका सर्व जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे असे पार्टीचे वरिष्ठ नेते डॉ. पठाण यांनी सांगितले.ङ्गसदर कार्यक्रमात पक्ष नेते चंद्र प्रकाश उपाध्याय, विवेक वाघमारे, धर्मेंद्र चव्हाण, शाहनवाज सय्यद व इतर सदस्यांनी सहभाग नोंदवला.

## आदर्श सेवा मुंबईकर मंडळ सोनसडेचे वतीने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न.

तळा कृष्णा भोसले

तळा तालुक्यातील सोनसडेचे आदर्श मुंबई मंडळ, ग्रामस्थ व महिला मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

भारतीय वंशाची वड, पिंपळ, कडुनिंब अशीच सुमारे ७० झाडे तळा इंदापूर सोनसडेचे बसस्थानक ते सोनसडेचे दुसरे

स्थानक अशा परिसरात या झाडाची लागवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य

महीला भगिनी यांनी खुप मेहनत घेतली. या परिसरातील

झाडे ही रस्ता रुंदी करणात तोडली गेली होती. या भागात

उन्हाळ्यात खुप तापमान जाणवते. या बाबी लक्षात घेऊन

दिर्घ आयुष्य जगणारी, मोठी वाढणारी व जास्त आॅक्सिजन देणारी अशीच झाडे लावली गेली आहेत

या झाडांचे संगोपन करण्याचा निर्धार सुद्धा करण्यात आला आहे. तरच ही झाडे जगतील. असे अनेकांनी आपल मत मांडले आहे. ही सर्व झाडे ग्रामपंचायत च्या माध्यमातून ग्रामसेवक उमाजी माडेकर यांनी उपलब्ध करून दिली. अशा स्तुत्य उपक्रमात सहभागी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम यशस्वी झाला.



पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर कऋऋ बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय - अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )